ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली
दिनांक :– २५.११.२०२४

# प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक मनोज मधुकर मगरे, अधीक्षक, वर्ग –२, C.G.S.T. कार्यालय हिंगोली रा. उदयोग सिध्दांत अपार्टमेंट, दुसरा मजला. फ्लॅट नं.ए/७, देवानगरी, शहानुरवाडी, संभाजी नगर यांनी १०,०००/–रू. लाचेची मागणी करून दि. २५.११.२०२४ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान १०,०००/– लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे हिंगोली शहर. जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

---

दिनांक २२.११.२०२४ रोजी यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.हिंगोली येथे तक्रार दिली होती की, तक्रारदार यांचे नावे कुरूंदकर फार्मस प्रोडयुसर कंपनी लि. या नावाने नोंदणिकृत कंपनी असून त्यांचा कच्या केळी पासून चिप्स बनवून विक्री करण्याचा व्यवसाय आहे. तक्रारदार यांनी मागील सहा महिन्यापासून कंपनीचे जिएसटी रिटर्न न भरल्या बाबतची नोटीस त्यांचे कंपनीचे मेलवर प्राप्त झाली आहे. लोकसेवक मगरे यांनी फोनव्दारे तक्रारदार यांना कळविले की, त्यांचे कंपनीचे जि.एस.टी. रजिट्रेशन कॅन्सल न करण्याकरीता व कंपीनीचे जि.एस.टी रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यासाठी वरीष्ठाकडे पाठविले नाही म्हणून १०,०००/– रू लाचेची मागणी केल्या बाबतची तक्रार दिली होती. दिनांक २२.११.२०२४ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी केली असता आलोसे मनोज मधूकर मगरे, अधीक्षक, यांनी तक्रारदार यांचे कंपनीचे रजिट्रेशन कॅन्सल न करण्याकरीता व कंपनीचे जि.एस.टी रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यासाठी वरीष्ठाकडे पाठविले नाही याचा मोबदला म्हणून १०,०००/– रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले त्यावरून आज दिनांक २५.११.२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक मनोज मगरे, अधीक्षक, यांना १०,०००/– रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्यावरून **मनोज मधुकर मगरे, अधीक्षक, वर्ग –२, C.G.S.T. कार्यालय हिंगोली उदयोग सिध्दांत अपार्टमेंट, दुसरा मजला. फ्लॅट नं. ए/७, देवा नगरी, शहानुरवाडी, छत्रपती संभाजी नगर** यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कामगिरी श्री.संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, व श्री.संजय तुंगार, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी श्री. प्रफुल्ल अंकुशकर, श्री.विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, शेख युनूस, सपोउपनि, विजय शुक्ला, पोहेकॉ/तानाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींगे, रविंद्र वरणे, गजानन पवार, गोविंद शिंदे, भगवान मंडलीक, राजाराम फुपाटे, मपोह श्रीमती योगीता अवचार, पोशि/शिवाजी वाघ, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५**
**मोबाईल क्र. ९८२२२५९९३२**

**विकास घनवट**
**पोलीस उप अधीक्षक**
**लायलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली,**